**प्रेस नोट** **दिनांक ०८/०५/२०१९**

## फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे

### अक्षय तृतीया निमित्त दगडुशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकाची रिक्षात गेलेली बॅग पोलीसांनी तीन तासात परत मिळवुन दिली.

दिनांक ०७/०५/२०१९ रोजी अक्षय तृतीया निमित्ताने श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होती. भाविक काशिनाथ बाळके, रा. भुगाव हे त्यांची पत्नी शिवगौरी, बहिण वैशाली गौड व मुलीसह भुगाव वरुन उबेर ॲटो रिक्षा क्रमांक एम.एच.१२ डी.जी. ३४१० या ॲटो मधुन दगडुशेठ गणपतीच्या दर्शनासाठी आले होते. ते बुधवार चौकात दर्शनासाठी उतरले होते व त्यांची बॅग सदर रिक्षात तशीच राहिली होती. सदर भाविक हे १८.०. वा.चे सुमारास फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे येथे तक्रार देण्यासाठी आले होते. तेव्हा फरासखाना पोलीस स्टेशन, ठाणे अंमलदार पोलीस हवालदार पाटील व पोलीस नाईक सपकाळ यांनी त्यांच्या कडुन सविस्तर माहिती घेवुन उबेर ॲपवरुन रिक्षा चालकाची माहिती घेतली व त्याचे नाव गणेश दत्तात्रय मानुरकर,रा.वाघोली यांचेशी संपर्क करुन बॅग बाबत माहिती विचारली असता, रिक्षा चालक याने प्रामाणिकपणे बॅग रिक्षामध्येच विसरल्याचे सांगितले. सदर रिक्षा चालकास बॅग तात्काळ फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे. येथे आणुन देण्याची समज दिली. सदरची बॅग काशिनाथ बाळके यांनी चेक केली असता, सदर बॅगेमध्ये त्यांचे बॅकेचे कागदपत्र, ए.टी.एम. कार्ड व नगदी ५०० रुपये व इतर कपडे सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. अशा प्रामाणिक रिक्षा चालकाचा फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे. येथे पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला व सदर भाविक काशिनाथ बाळके यांना बॅग परत केली आहे.

सदर कार्यवाही किशोर नावंदे सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे. ठाणे अंमलदार पोलीस हवालदार पाटील, पोलीस नाईक सपकाळ, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे. यांनी केली.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे.